IIP International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ
An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील पिक प्रारूप आणि सिंचन क्षेत्राचा एक भौगोलिक अभ्यास

**सौ. सुमित्राबाई राठोड, श्री महेंद्र कसबे, डॉ. अंकुश शंकर शिंदे**
संशोधक विद्यार्थी, भूगोल संशोधन केंद्र द. भै. फ. दयानंद कॉलेजऑफ आर्ट्स अंड सायन्स, सोलापूर
संशोधक विद्यार्थी, भूगोल संशोधन केंद्र द. भै. फ. दयानंद कॉलेजऑफ आर्ट्स अंड सायन्स, सोलापूर
प्राध्यापक, सी. बी. खेडगीज् बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स आणि राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट

**Article Info**

***Article History:***
Received: 26th Sep 2025
Accepted: 10th Oct 2025
Published: 25th Oct 2025

***Keywords:***
पिक प्रारूप भूधारण क्षेत्र,
सिंचन क्षेत्र,
पिक उत्पादन

**ABSTRACT**

कोणत्याही कृषी प्रदेशातील पिक प्रारूप हे त्या प्रदेशाचे कृषी धोरण स्पष्ट करत असते. थोडक्यात पिक प्रारुपावर तेथील हवामानाचा, प्राकृतिक रचनेचा परिणाम होत असतो. त्यामुळे वैशिष्टेपूर्ण प्रदेशात वैशिष्टेपूर्ण पिक-प्रारूप आढळते. काही विशिष्ठ पिके त्या प्रदेशाची मुख्य पिके म्हणून ओळखली जातात. प्रारूप (cropping pattern) म्हणजे एखाद्या शेतजमिनीवर कोणत्या पिकांची आणि कोणत्या क्रमाने लागवड केली जाते याचे नियोजन होय कि ज्यामध्ये हवामान, मातीचा प्रकार, पाणी उपलब्धता आणि बाजारपेठेची मागणी या घटकांचा विचार करून पिकांची निवड केली जाते. याचा मुख्य उद्देश जमिनीची सुपीकता टिकवणे, तण आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी करणे तसेच कमी संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करणे हा असतो. शेतकरी पिक प्रारूपामध्ये एकाल पिक पद्धत, बहूपिक पद्धत किंवा पिक फेरपालट पद्धत अवलंबतात. सिंचन क्षेत्र म्हणजे शेतजमिनीचा असा भाग जिथे पिकांना वाढीसाठी पावसाव्यतिरिक्त कृत्रिमरित्या पाणी पुरवले जाते. हे क्षेत्र विशिष्ट सिंचन प्रकल्पांतर्गत येते, जसे की कालवे किंवा विहिरींमधून पाणी दिले जाते. सिंचन क्षेत्र हे जमिनीचे असे क्षेत्र आहे, ज्याला सिंचन व्यवस्थेद्वारे पाणी मिळते आणि पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याची पूर्तता केली जाते.

प्रस्तुत संशोधन लेखांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्याचा सर्व प्रकारच्या शेतकऱ्यांच्या अधिपत्याखाली असणारी भूधारण क्षेत्र, पिक प्रारूप व्यवस्थापन , त्यांचे सिंचन क्षेत्र क्षमता, सिंचन तीव्रता याचा अभ्यास केला जाणार आहे.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: Oct 09, 2025
Similarity Index: 6%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Rathod, S., Kasabe, M., & Shinde, A. S. (2025). **सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील पिक प्रारूप आणि सिंचन क्षेत्राचा एक भौगोलिक अभ्यास.** IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 2(IV), 818–826.

## प्रास्ताविक

कोणत्याही कृषी प्रदेशातील पिक प्रारूप हे त्या प्रदेशाचे कृषी धोरण स्पष्ठ करत असते. थोडक्यात पिक प्रारुपावर तेथील हवामानाचा, प्राकृतिक रचनेचा परिणाम होत असतो. त्यामुळे वैशिष्ठेपूर्ण प्रदेशात वैशिष्ठेपूर्ण पिक-प्रारूप आढळते. काही विशिष्ठ पिके त्या प्रदेशाची मुख्य पिके म्हणून ओळखली जातात. प्रारूप (cropping pattern) म्हणजे एखाद्या शेतजमिनीवर कोणत्या पिकांची आणि कोणत्या क्रमाने लागवड केली जाते याचे नियोजन होय कि ज्यामध्ये हवामान, मातीचा प्रकार, पाणी उपलब्धता आणि बाजारपेठेची मागणी या घटकांचा विचार करून पिकांची निवड केली जाते. याचा मुख्य उद्देश जमिनीची सुपीकता टिकवणे, तण आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी करणे तसेच कमी संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करणे हा असतो. शेतकरी पिक प्रारूपामध्ये एकाल पिक पद्धत, बहूपिक पद्धत किंवा पिक फेरपालट पद्धत अवलंबतात. सिंचन क्षेत्र म्हणजे शेतजमिनीचा असा भाग जिथे पिकांना वाढीसाठी पावसाव्यतिरिक्त कृत्रिमरित्या पाणी पुरवले जाते. हे क्षेत्र विशिष्ट सिंचन प्रकल्पांतर्गत येते, जसे की कालवे किंवा विहिरींमधून पाणी दिले जाते. सिंचन क्षेत्र हे जमिनीचे असे क्षेत्र आहे, ज्याला सिंचन व्यवस्थेद्वारे पाणी मिळते आणि पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याची पूर्तता केली जाते.

बार्शी तालुका सोलापूर जिल्ह्याच्या ईशान्य भागात असून ते बालाघाट पर्वतरांगांच्या पायथ्याशी वसलेले आहे. उत्तरेला उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम तालुका , ईशान्येला उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुका , पूर्वेला उस्मानाबाद तालुका , ईशान्येला उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुका , आग्नेय आणि पश्चिमेला माढा तालुका आणि दक्षिणेला सोलापूर उत्तर तालुका आणि वायव्येला परेंडा तालुका आहे. या तालुक्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १५४७.१५ किमी² असून क्षेत्रफळाच्या बाबतीत ते सोलापूर जिल्ह्यात चौथ्या क्रमांकावर आहे. हा तालुका सोलापूर जिल्ह्याच्या मध्यवर्ती उंच भागात वसलेले आहे. याचा अक्षवृत्तीय विस्तार १७°५५'५३" उत्तर ते १८°२६'२५" उत्तर आणि रेखावृत्तीय विस्तार ७५°३२'२४" पूर्व ते ७६°०'५९" पूर्व रेखावृत्त आहे. बार्शी तालुक्याचे हवामान कोरडे आणि उष्ण स्वरूपाचे असून मार्च ते मे महिन्यात अत्याधिक तापमान आणि नोव्हेबर ते जानेवारी महिन्यात कमी तापमानाची नोंद होते . सन २०२३ नुसार जिल्ह्याचा सरासरी पर्जन्यमान ५५० मिमी आहे. सन २०००-०१ मध्ये बार्शी तालुक्यात एकूण पिकाखालील क्षेत्र ११७९३७ हेक्टर होते तर ते सन २०१५-१६ मध्ये १३८७५६ हेक्टर होते. तसेच निव्वळ जलसिंचित क्षेत्र आणि निव्वळ पिकाखालील क्षेत्र यांचे गुणोत्तर सन २०००-०१ साली ८.०१% % तर सन २०१५-१६ साली ७.९५ % इतके होते. तसेच एकूण जलसिंचित क्षेत्र आणि एकूण पिकाखालील क्षेत्राचे प्रमाण गुणोत्तर सन २०००-०१ साली १०.८३% तर सन २०१५-१६ साली १२.६९ % इतके होते/

## उद्दिष्टे

1) बार्शी तालुक्यातील पिक प्रारुपतेचा व सिंचन क्षेत्राचा अभ्यास करणे
2) सन २०००-०१ पासून २०१५-१६ या कालखंडात पिक प्रारुपतेमध्ये व सिंचन क्षेत्राचा झालेला बदल अभ्यास करणे.

## संशोधन पद्धती

सन २०००-०१ आणि २०१५-१६ या वर्षाची कृषिविषयक आणि सन १९९१, सन २००१, सन २०११ या वर्षाची लोकसंख्याविषयक द्वितीयक सांख्यिकी आकडेवारी घेण्यात आलेली आहे. द्वितीयक सांख्यिकी आकडेवारी हि जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, कृषी विभागातर्फे प्रकाशित होणारे होणारे वार्षिक कृषी मासिके, लेख, बुलेटीन, जिल्हा प्राथमिक जनगणना पुस्तिका, कृषी पुस्तिका याचा आधार घेण्यात आलेला आहे.

**अभ्यास क्षेत्र**

बार्शी तालुका सोलापूर जिल्ह्याच्या ईशान्य भागात असून ते बालाघाट पर्वतरांगांच्या पायथ्याशी वसलेले आहे. उत्तरेला उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम तालुका , ईशान्येला उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुका , पूर्वेला उस्मानाबाद तालुका , ईशान्येला उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुका , आग्नेय आणि पश्चिमेला माढा तालुका आणि दक्षिणेला सोलापूर उत्तर तालुका आणि वायव्येला परेंडा तालुका आहे. या तालुक्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १५४७.१५ किमी$^2$ असून क्षेत्रफळाच्या बाबतीत ते सोलापूर जिल्ह्यात चौथ्या क्रमांकावर आहे. हा तालुका सोलापूर जिल्ह्याच्या मध्यवर्ती उंच भागात वसलेले आहे. याचा अक्षवृत्तीय विस्तार १७°५५'५३" उत्तर ते १८°२६'२५" उत्तर आणि रेखावृत्तीय विस्तार ७५°३२'२४" पूर्व ते ७६°०'५९" पूर्व रेखावृत्त आहे.



1) **भू-धारक शेतकऱ्यांचे भू-धारण क्षेत्र**

| सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील भू-धारक शेतकऱ्यांचे भू-धारण क्षेत्र | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | शेतकरी / भू-धारक | भू-धारक शेतकऱ्यांची संख्या आणि टक्केवारी | | फरक | भू धारक शेतकऱ्यांचे भू-धारक क्षेत्र (हेक्टरमध्ये आणि टक्केवारीमध्ये) | | फरक |
| | | **२०००-०१** | **२०१५-१६** | | **२०००-०१** | **२०१५-१६** | |
| १ | सीमांतिक | १७०८५ (२९.२७%) | ३४९०२ (४६.०६%) | १७८१७ (१६.७९%) | ९७१४ (७.६४%) | १४५११ (११.५८%) | ४७९७ (३.९४%) |
| २ | लहान | १८९९९ (३२.५५%) | २१११२ (२७.८६%) | २११३ (-४.६९%) | २७५७१ (२१.७१%) | ३२५०२ (२५.९४%) | ४९३१ (४.२३%) |
| ३ | निम- मध्यम | १५३४० (२६.२८%) | १४२५६ (१८.८१%) | -१०८४ (-७.४७%) | ४४१८९ (३४.७९%) | ४१५९० (३३.२०%) | -२५९९ (-१.५९%) |
| ४ | मध्यम | ६१९५ (१०.६१%) | ५०६५ (६.६८%) | -११३० (-३.९३%) | ३५८२० (२८.२०%) | २८८१८ (१८.२१%) | -७००२ (-९.९९%) |
| ५ | मोठे | ७४४ (१.२७%) | ४४० (०.५८%) | -३०४ (-०.६९%) | ९६९२ (७.६३%) | ७८३३ (६.२५%) | -१८५९ (--१.३८%) |
| | जिल्हा | ५८३६३ | ७५७७५ | १७४१२ | १२६९८७ | १२५२५४ | -१७३३ |

*(लेखकाद्वारे संकलित)*

भू-धारण क्षेत्रावरच शेतीचा विकास अवलंबून असतो. कारण कृषी विकासासाठी आवश्यक असणारी शेती-अवजारे व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा मुख्यत: भू-धारण क्षेत्राच्या आकारावर अवलंबून असतो. जितके क्षेत्र मोठे , तितके आधुनिक कृषी अवजारे आणि आधुनिक शेती सामग्री वापरणे सोयीचे जाते. लहान आकाराच्या भू-धारकांना आधुनिक कृषी यंत्र सामुग्री वापरणे त्यांच्या आर्थिक स्थितीमुळे शक्य होत नाही.

बार्शी तालुक्यात सन २०००-०१ मध्ये कि एकूण भू -धारण क्षेत्र सुमारे १२६९८७ हेक्टर होते . त्यापैकी सुमारे ७.६४% क्षेत्र सिमान्तिक शेतकऱ्याकडे; सुमारे २१.७१% क्षेत्र लहान शेतकऱ्याकडे; सुमारे ३४.७९% क्षेत्र निम-मध्यम शेतकऱ्याकडे; सुमारे २८.२०% क्षेत्र मध्यम शेतकऱ्याकडे आणि सुमारे ७.६३% क्षेत्र मोठ्या शेतकऱ्याकडे आहे.

सन २०१५-१६ मध्ये कि एकूण भू -धारण क्षेत्र सुमारे १२५२५४ हेक्टर होते . त्यापैकी सुमारे ११.५८% क्षेत्र सिमान्तिक शेतकऱ्याकडे; सुमारे २५.९४% क्षेत्र लहान शेतकऱ्याकडे; सुमारे ३३.२०% क्षेत्र निम-मध्यम शेतकऱ्याकडे; सुमारे १८.२१% क्षेत्र मध्यम शेतकऱ्याकडे आणि सुमारे ६.२५% क्षेत्र मोठ्या शेतकऱ्याकडे आहे.

**ब) बार्शी तालुक्यातील भू-धारक शेतकऱ्यांचे सिंचीत व असिंचित भू-धारण क्षेत्र**

सिंचन क्षेत्र म्हणजे शेतजमिनीचा असा भाग जिथे पिकांना वाढीसाठी पावसाव्यतिरिक्त कृत्रिमरित्या पाणी

पुरवले जाते. हे क्षेत्र विशिष्ट सिंचन प्रकल्पांतर्गत येते, जसे की कालवे किंवा विहिरींमधून पाणी दिले जाते. सिंचन क्षेत्र हे जमिनीचे असे क्षेत्र आहे, ज्याला सिंचन व्यवस्थेद्वारे पाणी मिळते आणि पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याची पूर्तता केली जाते. सिंचनामुळे शेतकऱ्यांना पिक उत्पनाची शाश्वती मिळते. पिक विविधता आणि पिक एकत्रीकरण केले जाऊ शकते. शेतीमध्ये आधुनिक सुधारित वाण-बी-बियाणाचा वापर करता येतो. रासायनिक खतांचा वापर करता येतो. सिंचन क्षेत्र हे कालवे, विहिरी, तलाव, ठिबक किंवा तुषार सिंचन यांसारख्या कृत्रिम पद्धतींचा वापर करते.

**सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील भू-धारक शेतकऱ्यांचे सिंचित आणि अ-सिंचित भू-क्षेत्र**

| अ. क्र | शेतकरी / भू-धारक | भू धारक शेतकऱ्यांचे भू-धारणक्षेत्र हेक्टरमध्ये (भू-धारण क्षेत्राचे तालुक्यामधील टक्केवारी) {भू-धारण क्षेत्रानुसार टक्केवारी } | | | | | शेतकरी / भू-धारक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (२०००-०१) | | | २०१५-१६ | | |
| | | जलसिंचित क्षेत्र | अ-जलसिंचित क्षेत्र | | जलसिंचित क्षेत्र | अ-जलसिंचित क्षेत्र | |
| १ | सीमांतिक | ८४१ (६.३८%) {९.०८%} | ८४१२ (९.२६%) {९०.११%} | | १४७० (८.३४%) {९.४५%} | १४०७३ (११.६१%) {९०.५५%} | सीमांतिक |
| २ | लहान | २४३५ (१८.४८%) {९.३५%} | २३५८७ (२५.९६%) {९०.६४%} | | ४२९२ (२४.३७%) {१२.५९% } | २९७९७ (२४.६०%) {८७.४१%} | लहान |
| ३ | निम-मध्यम | ३४०१ (२५.८२%) {८.१९%} | ३८११२ (४१.९६%) {९१.५९%} | | ५६४१ (३२.०३%) {१२.४७% } | ३९५८५ (२९.३८%) {८७.५३%} | निम- मध्यम |
| ४ | मध्यम | २२७६ (१७.२८%) {६.९८%} | ३०३१५ (३४.४७%) (९३.०१%} | | ५१७५ (२९.३८%) {१५.०१% } | २९२९० (२४.१८%) {८४.९९%} | मध्यम |
| ५ | मोठे | ४३३ (३.२८%) {५.०६%} | २१८४ (२.४०%) {९४.९३%} | | १०३१ (५.८५%) {१०.९२% } | ८४१० (६.९४%) {८९.०८%} | मोठे |
| | जिल्हा | १३१७० {७.९५%} | ९०८२८ | | १७६१० { १२.६९%} | १२१११६ {८७.३१%} | जिल्हा |

*(लेखकाद्वारे संकलित)*

सन २०००-०१ मध्ये बार्शी तालुक्यात एकूण १३१७० हे जल- सिंचित क्षेत्र होते . त्यापैकी सिमान्तिक

भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे ६.३८% ; लहान भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे १८.४८% ; निम-मध्यम भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे २५.८२% ; मध्यम भू- धारक शेतकऱ्याकडे १७.२८% आणि मोठ्या भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे ३.२८% होते. सन २०१५-१६ मध्ये एकूण बार्शी तालुक्यात एकूण १७६१० हे जल-सिंचित क्षेत्र होते . त्यापैकी सिमान्तिक भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे ८.३४% ; लहान भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे २४.३७% ; निम-मध्यम भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे ३२.०३% ; मध्यम भू- धारक शेतकऱ्याकडे २९.३८% आणि मोठ्या भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे ५.८२% होते.

1) **सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील पिक प्रारूप**

पीक प्रारूप (cropping pattern) म्हणजे एखाद्या शेतजमिनीवर कोणत्या पिकांची आणि कोणत्या क्रमाने लागवड केली जाते याचे नियोजन होय कि ज्यामध्ये हवामान, मातीचा प्रकार, पाणी उपलब्धता आणि बाजारपेठेची मागणी या घटकांचा विचार करून पिकांची निवड केली जाते. याचा मुख्य उद्देश जमिनीची सुपीकता टिकवणे, तण आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी करणे तसेच कमी संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करणे हा असतो. शेतकरी पिक प्रारूपामध्ये एकाल पिक पद्धत, बहूपिक पद्धत किंवा पिक फेरपालट पद्धत अवलंबतात. एकल पिक पद्धतीमध्ये एकाच पिकाची सातत्याने लागवड करतात तर बहुपिक पद्धतीमध्ये एकाच वेळी एकाच शेतात जास्त पिकाची लागवड करतात. यामध्ये मिश्र पिक पद्धत किंवा आंतरपीक पद्धत वापरतात. मिश्र पिक पद्धतीमध्ये एकाच शेतात एकाच वेळी दोन किंवा अधिक पिकांची लागवड करतात. तर आंतरपिक पद्धतीमध्ये एकाच शेतात एकापेक्षा जास्त पिके एकमेकांजवळ लागवड करून घेतात. पिक फेरपालट पद्धतीमध्ये एकाच जमिनीमध्ये वेगवेगळ्या हंगामामध्ये आलटून पालटून विविध पिकांची लागवड करून जमिनीची सुपीकता टिकवण्याचा प्रयत्न करतात. पिक प्रारुपाच्या विविध अवलंबिलेल्या पद्धतीमुळे जमिनीतील अन्नद्रव्याचा साठ समतोल राहून जमिनीची सुपीकता टिकून राहते, तसेच योग्य नियोजन केल्यामुळे पिकांचे उत्पादन वाढते, आणि एकाच पिकाच्या फेरपालटामुळे जमिनीतील कीटक आणि तणांचा प्रादुर्भाव कमी होत जातो.

**सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील पिक प्रारूप**

| | | २०००-०१ | | फरक | | २०१५-१६ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | पिकांचे नांव | एकूण पिक व्याप्त क्षेत्र (हे) | पिकांचे एकूण पिका खालील क्षेत्राशी गुणोत्तर (%) | एकूण पिक व्याप्त क्षेत्र (हे) | पिकांचे एकूण पिका खालील क्षेत्राशी गुणोत्तर (%) | एकूण पिक व्याप्त क्षेत्र (हे) | पिकांचे एकूण पिका खालील क्षेत्राशी गुणोत्तर (%) | पिकांचे नांव |
| १ | तांदूळ | २६६ | ०.२२ | ६६१ | ०.४४ | ९२७ | ०.६६ | तांदूळ |
| २ | ज्वारी | ७८४४२ | ६६.५१ | -४९२ | -१०.३४ | ७७९५० | ५६.१७ | ज्वारी |
| ३ | गहू | ९३९ | ०.७९ | २३४९ | १.५७ | ३२८८ | २.३६ | गहू |
| ४ | बाजरी | १४५ | ०.१२ | -१०१ | -०.०९ | ४४ | ०.०३ | बाजरी |
| ५ | मका | ७३१ | ०.६१ | २०४ | ०.०६ | ९३५ | ०.६७ | मका |
| ६ | इतर तृणधान्ये | ८९ | ०.०७ | -८० | -०.०६ | ०९ | ०.००६ | इतर तृणधान्ये |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ)** | **एकूण तृणधान्ये** | **८०६१२** | **६८.३५** | **२५४१** | **-८.४३** | **८३१५३** | **५९.९२** | **एकूण तृणधान्ये** |
| १ | हरभरा | ५४४ | ०.४६ | ४३४० | ३.०५ | ४८८४ | ३.५१ | हरभरा |
| २ | तूर | ११८९६ | १०.०८ | -३९०६ | १.४४ | १५९९० | ११.५२ | तूर |
| ३ | मूंग | ३०८ | ०.२६ | ५५६ | ०.३६ | ८६४ | ०.६२ | मूंग |
| ४ | इतर कडधान्ये | ३५५२ | ३.०१ | -२० | -०.४७ | ३५३२ | २.५४ | इतर कडधान्ये |
| **ब)** | **एकूण कडधान्ये** | **२४३००** | **२०.६०** | **९४०** | **-२.४१** | **२५२४०** | **१८.१९** | **एकूण कडधान्ये** |
| **क)** | **एकूण अन्नधान्ये** | **१०४९१२** | **८८.९५** | **३४८१** | **-१०.८४** | **१०८३९३** | **७८.११** | **एकूण अन्नधान्ये** |
| १ | भुईमुग | २२९२ | १.९४ | -२२०१ | -१.८८ | ९१ | ०.०६ | भुईमुग |
| २ | करडी | ५०७ | ०.४२ | -५०७ | -०.४२ | ०० | ०० | करडी |
| ३ | सुर्यफुल | ४३०९ | ३.६५ | -४२८९ | -३.६४ | २० | ०.०१ | सुर्यफुल |
| ४ | सोयाबीन | २६८ | ०.२२ | २०३३७ | १४.६२ | २०६०५ | १४.८४ | सोयाबीन |
| **ड)** | **एकूण गळीत धान्ये** | **७४०४** | **६.२७** | **१३३४६** | **८.६८** | **२०७५०** | **१४.९५** | **एकूण गळीत धान्ये** |
| १ | ऊस | ३०२५ | २.५६ | १२६८ | ०.५३ | ४२९३ | ३.०९ | ऊस |
| २ | कापूस | ६३ | ०.०५ | -५३ | -०.०४ | १० | ०.००७ | कापूस |
| **इ)** | **एकूण नगदी पिके** | **३०८८** | **२.६१** | **१२२५** | **१.१८** | **४३१३** | **३.१०** | **एकूण नगदी पिके** |
| ई) | एकूण फळे आणि भाजीपाला | १९५४ | १.६५ | ३२९३ | २.१३ | ५२४७ | ३.७८ | एकूण फळे आणि भाजीपाला |
| | एकूण मसाले | ८७ | ०.०७ | -२९ | -०.०३ | ५८ | ०.०४ | एकूण मसाले |
| | चारा व हिरवळी क्षेत्र | १८८ | ०.१५ | -८६ | -०.१४ | ०२ | ०.००१ | चारा व हिरवळी क्षेत्र |
| **फ)** | **एकूण खाद्य पिके** | **१०९९८६** | **९३.२५** | **८००५** | **-८.२२** | **११७९९१** | **८५.०३** | **एकूण खाद्य पिके** |
| **ग)** | **एकूण अखाद्य पिके** | **७९५१** | **६.७४** | **१२८१४** | **८.२२** | **२०७६५** | **१४.९६** | **एकूण अखाद्य पिके** |
| **च)** | **एकूण पिकाखालील क्षेत्र** | **११७९३७** | | **२४८१९** | | **१३८७५६** | | **एकूण पिकाखालील क्षेत्र** |

*(लेखकाद्वारे संकलित)*

सन २०००-०१ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील एकूण पिकाखालील क्षेत्र सुमारे ११७९३७ हेक्टर असून त्यापैकी एकूण तृणधान्याखाली ६८.३५ % ; एकूण कडधान्याखाली २०.६०%; एकूण अन्नाधान्याखाली ८८.९५%; एकूण गळीत-धान्याखाली ६.२७% ; नगदी पिकाखाली २.६१% ; एकूण फळे व भाजीपाल्याखाली १.६५% आणि एकूण मासाल्याखाली ०.०७% होते. बार्शी तालुक्यात एकूण तृणधान्यापैकी सुमारे ०.३२% तांदूळ पिकाखाली, सुमारे ९७.१८% क्षेत्र ज्वारी पिकाखाली; सुमारे १.१६% गहू पिकाखाली क्षेत्र होते. तर एकूण कडधान्यापैकी सुमारे ८१.८७% तूर ; सुमारे १.२६% हरभरा ; सुमारे १.२६% मुग होते. तर एकूण

गळीत धान्यापैकी सुमारे ५८.१७% सुर्यफुल; सुमारे ३०.९४% भूईमुग; सुमारे ६.८४% करडी होते. एकूण नगदी पिकापैकी सुमारे ९७.९५% ऊस; सुमारे २.०४% कापूस पिक होते.

सन २०१५-१६ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील एकूण पिकाखालील क्षेत्र सुमारे १३८७५६ हेक्टर असून त्यापैकी एकूण तृणधान्याखाली ५९.९२ % ; एकूण कडधान्याखाली १८.१९ %; एकूण अन्नाधान्याखाली ७८.११ %; एकूण गळीत-धान्याखाली १४.९५ %; नगदी पिकाखाली ३.१०%; एकूण फळे व भाजीपाल्याखाली ३.७८% आणि एकूण मासाल्याखाली ०.०४ % होते. बार्शी तालुक्यात एकूण तृणधान्यापैकी सुमारे १.११% तांदूळ पिकाखाली, सुमारे ९३.७४% क्षेत्र ज्वारी पिकाखाली; सुमारे ३.९५% गहू पिकाखाली क्षेत्र होते. तर एकूण कडधान्यापैकी सुमारे ६३.३५% तूर ; सुमारे १९.३५% हरभरा ; सुमारे ८.४२% मुग होते. तर एकूण गळीत धान्यापैकी सुमारे ९९.३० % सोयाबीन ; सुमारे ०.४३% भूईमुग; सुमारे होते. एकूण नगदी पिकापैकी सुमारे ९९.५३% ऊस; सुमारे ०.०२% कापूस पिक होते.

**निष्कर्ष :**

१) सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्याचा पिक प्रारूपतेचा अभ्यास केला असता असे दिसून येते कि अभ्यास संशोधन कालावधीत एकूण तृण धान्याखाली सुमारे ८.४३% आणि अन्नधान्य पिक क्षेत्राखाली सुमारे १०.८४% घट झाली तर एकूण गळीत-धान्याखालील क्षेत्रात सुमारे ८.६८% एकूण नगदी पिकाखालील क्षेत्रात १.१८ % आणि एकूण फळे व भाजीपाला पिकाखालील क्षेत्रात सुमारे २.१३%; एकूण वाढ झाल्याचे दिसून येते.

२ बार्शी तालुक्यात सन २०००-०१ मध्ये कि एकूण भू -धारण क्षेत्र सुमारे १२६९८७ हेक्टर होते . त्यापैकी सुमारे ७.६४% क्षेत्र सिमान्तिक शेतकऱ्याकडे; सुमारे २१.७१% क्षेत्र लहान शेतकऱ्याकडे; सुमारे ३४.७९% क्षेत्र निम-मध्यम शेतकऱ्याकडे; सुमारे २८.२०% क्षेत्र मध्यम शेतकऱ्याकडे आणि सुमारे ७.६३% क्षेत्र मोठ्या शेतकऱ्याकडे आहे.

सन २०१५-१६ मध्ये कि एकूण भू -धारण क्षेत्र सुमारे १२५२५४ हेक्टर होते . त्यापैकी सुमारे ११.५८% क्षेत्र सिमान्तिक शेतकऱ्याकडे; सुमारे २५.९४% क्षेत्र लहान शेतकऱ्याकडे; सुमारे ३३.२०% क्षेत्र निम-मध्यम शेतकऱ्याकडे; सुमारे १८.२१% क्षेत्र मध्यम शेतकऱ्याकडे आणि सुमारे ६.२५% क्षेत्र मोठ्या शेतकऱ्याकडे आहे.

३) सोलापूर जिल्ह्यातील भू- धारण क्षेत्राचा अभ्यास केला असता सिमान्तिक प्रकारच्या भू-धारकांच्या संख्येतसुमारे १६.७९ % वाढ झाल्याचे दिसून येते. तर उरलेल्या भू-धारकंच्या संख्येत घट झाल्याचे दिसून येते. म्हणजेच जमिनीचे तुकडीकरण होत आहे , असे दिसून येते. त्याचप्रमाणे सिमान्तिक आणि लहान प्रकारच्या भू-धारकांच्या भू-क्षेत्रात एकत्रित सुमारे ८.१७% वाढ दिसून येते तर अन्य भू-धारकांच्या भू-क्षेत्रात घट दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१) Socio economic Abstract of Solapur District.
२) A New geography of Maharashtra : Afzal Sharieff , Massod Ali Khan, A. Balakishan.
३) Geography of Maharashtra –Dr. S. M. Bhamare.
४) Census of Maharashtra.
५) Economic Review of Maharashtra
६) Agricultural Geography- Masjid Hussain
७) डॉ. अंकुश शंकर शिंदे श्री धूळोबा बाळू वाघमोडे **"कृषी भू-धारण क्षेत्र आणि सिंचन क्षेत्राचा भौगोलिक अभ्यास : विशेषत: सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व जमातीतील शेतकऱ्यांचा एक नमुना अभ्यास"** International Journal of Advance and Applied Research (IJAAR) Impact

Factor – 7.328 ISSN – 2347-7075 , Vol.4, Issue Dec 202

८) Shri Shinde A.S. 2017, **" Cropping Pattern & Irrigation Status of Marginal Agricultural Cultivators"** Published in **WIZCRAFT** Publication & Distribution Pvt Ltd. ISBN NO 978-93-86013-43-9 held at Mandrup dated 18th Feb 2017.

९) Shri Shinde A.S. 2013, ***"The Demographic Characteristics of Scheduled Caste populations in Solapur district."*** Published in '***Review of Research'*** International Online Multidisciplinary Journal Vol 3, Issue 1, Oct 2013 2.1002(UIF) 2249-849X

१०) Shri Shinde A.S. ***"Disparity Level in Agricultural Development in Solapur District"*** Special issue of an International Scholarly **Research Journal for Interdisciplinary studies**, 30 Jan 2018 SJIF (2016)-6.177 ISSN 2349-4766(P), 2278-8808(E)

११ ) डॉ. अंकुश शंकर शिंदे श्री धूळोबा बाळू वाघमोडे June 2024 ***"धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील पिक प्रारूप आणि सिंचन क्षेत्राचा एक भौगोलिक अभ्यास"*** published in ***International Journal of Advance And Applied Research*** , Impact Factor -7.38 ISSN 2347-7075 , Volume-5, No-20